# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., काळेवाडी

मुख्य कार्यालय : विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी, पुणे - १७.
दुरध्वनी : ९९२२९२५३११, ९९२२९४२५३१
Regd. No.: PNA / HLI / RSR / CR / 433 / 31-10-1988
Email : shramjivi.ho@gmail.com | www.shramjivipatsanstha.com


जावक क्र. : एच ओ./२८३/२०२५-२६ दिनांक : १९/०९/२०२५

प्रति,
**मा. सहकार आयुक्त व निबंधक सो.**
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११००१.

**विषय :- आदर्श पोटनियमान्वये वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर करणेबाबत.**

मा.महोदय,

उपरोक्त विषयी आपणास सविनय सादर करण्यात येते की, दिनांक २०/०७/२०२५ रोजी आमच्या संस्थेची वार्षिक सभा संपन्न झाली. आदर्श उपविधी पोटनियम क्र. ३८ अन्वये वार्षिक साधारण सभा इतिवृत्ताचे दि. ०८/०८/२०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभा विषय व ठराव क्र. ११ अन्वये नोंद घेतल्यानंतर सदरची प्रमाणित प्रत आपल्या कार्यालयाकडे पोटनियमान्वये माहितीस्तव सादर करीत आहोत. कृपया पोच दयावी ही विनंती.

कळावे,

आपला
**श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,करीता**

O/C

श्रमजिवी नागरी सह. पतसंस्था मर्या.
R. No.
PNA/HLI/RSR/CR/433
DATE : 31/10/1988
मुख्य कार्यालय
विजयनगर, काळेवाडी, पुणे-१७

**महाव्यवस्थापक**

सोबत :-
१.वार्षिक साधारण सभा इतिवृत्त पान क्र. १ ते ११
२. वार्षिक सभेचा अहवाल

19/09/2025
प्रमोद म्हस्के व. लि.
आवक लिपिक
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, म. रा. पुणे

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

| | | |
|---|---|---|
| १) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा** | ३)सभेची तारीख : २०/०७/२०२५ | ५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी |
| २) सभेचा क्रमांक : **३७ वी** | ४)सभेची वेळ : स.१०.०० वा. | |

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे

सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

श्रमजिवी नागरी सहकारी **पतसंस्थेची** पस्तीसावी **वार्षिक सर्वसाधारण** सभा रविवार दि. २० **जुलै** २०२५ रोजी सकाळी १०.०० **वाजता ''नटसम्राट निळू फुले रंगमंदिर,''** पिंपळे गुरव, पुणे ६१ येथे आयोजीत करण्यात आली होती. गणसंख्येची पुर्ती झाल्याने सभेस सकाळी ११.०० वाजता सुरवात करण्यात आली.

सभेस सुरूवात करण्यापुर्वी 'श्रीं' च्या प्रतिमेस अध्यक्ष मा.श्री.दिपक शिवाजीराव देशमुख यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.सागर भिमराव गाढवे यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाराष्ट्राचे शिल्पकार, सहकाराचे महामेरू व भारताचे माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चवहाण यांच्या प्रतिमेस संस्थेचे संचालक मा.श्री.प्रविण रामचंद्र ढमाळ यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

**प्रस्तावना व स्वागत :-**

राष्टगीताने सभेची सुरूवार करण्यात आली व संस्थेचे महाव्यवस्थापक श्री.विजय वाघमोडे यांनी सभेचे प्रस्ताविक व उपस्थित सभासदांचे स्वागत केले.

**मा.अध्यक्षाची निवड :-**

आजच्या सभेचे अध्यक्षस्थान सभेच्या नियमानुसार संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री.दिपक शिवाजीराव देशमुख यांनी स्विकारावे अशी सुचना संस्थेचे संचालक श्री. प्रविण ढमाळ यांनी केली, त्यास संचालक श्री.विजय गायकवाड यांनी अनुमोदन दिले. संस्थेचे अध्यक्ष श्री.दिपक शिवाजीराव देशमुख यांनी अध्यक्षस्थान स्विकारल्याचे जाहिर केले.

सभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी अहवाल वर्षात दिवंगत झालेले सर्व नागरीक, विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थेचे सभासद, हितचिंतक, ग्राहक, सभासदांचे नातेवाईक, थोर समाजसेवक, महान स्वातंत्र्य सैनिक, सामाजिक कार्यकते, जागतीक व भारतीय किर्तीचे शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, थोर साहित्यिक, शिक्षकतज्ञ यांना तसेच ज्ञात अज्ञात दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण केल्यानंतर सभेच्या पुढील कामकाजास सुरवात करण्यात आली.

अध्यक्ष श्री. दिपक शिवाजीराव देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या मनोगतामध्ये अहवाल पान क्र. ४ प्रमाणे सर्व सभासदांना संवोधीत करून संस्थेची प्रगती व परिस्थिती सभेपुढे नमुद केली. सर्वाचे आभार मानुन मनोगत पुर्ण केले व संस्थेचे अधिकृत कामकाज चालु करणे वावत सुचना दिल्या.

यानंतर सभेच्या मुख्य विषयांस सुरूवात झाली. महाव्यवस्थापक यांनी अहवालातील विषयपत्रीकेनुसार विषयाला सुरूवात केली ती पुढील प्रमाणे -

श्रमजिवी नागरी सह. पतसंस्था मर्या. R. No. PNA/HLURS/R/CR/433 DATE : 31/10/1988 मुख्य कार्यालय विजयनगर, काळेवाडी, पुणे-१७

विषय क्र. १ — दि. २८ जुलै २०२४ रोजीच्या वार्षिक साधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

ठराव क्र. १ — मागील सभेचा वृत्तांत वेवसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे तसेच सभागृहात सुध्दा प्रसिद्ध करण्यात आलेला असून सर्वांनी त्याची नोंद घेवून विषयास मान्यता देवून वृत्तांत कायम करावा अशी विनंती संस्थेचे महाव्यवस्थापक यांनी करून मागील सभेचा वृत्तांत उपस्थित सभेत वाचुन दाखविला.

१) सभेचा प्रकार- वार्षिक सर्वसाधारण सभा
२) सभेचा क्रमांक : ३७ वी
३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.
५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

सभासदांनी विषयास मंजुरी दिली व ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.राजेंद्र विठ्ठल घारे (३४३६)
अनुमोदक :- श्री.प्रकाश गडवे (५१८)
(ठराव सर्वानुमते मंजुर)

विषय क्र. २
सन २०२४-२५ अखेरची (ताळेबंद, नफा-तोटा) आर्थिक पत्रके व संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे.

ठराव क्र. २
सन २०२४-२५ चा वार्षिक अहवालातील पान क्र.१० ते १३ वर ताळेबंद व अहवालातील पान क्र. १४ ते १५ वर नफा तोटा पत्रकाचे वाचन महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सभेत केले, त्यास सभासदांनी मंजुरी दिली व या ठरावास एकमताने मंजुरी देण्यात आली.

| 31.03.2024 | भांडवल व देणी | 31.03.2025 | 31.03.2024 | मालमत्ता व येणी | 31.03.2025 |
|---|---|---|---|---|---|
| 500.00 | अधिकृत भागभांडवल | 500.00 | 21.62 | रोख शिल्लक | 27.32 |
| 339.86 | वसुल भागभांडवल | 354.15 | 123.44 | बँक शिल्लक | 124.74 |
| 675.22 | राखीव व इतर निधी | 748.17 | 2352.20 | गुंतावणूक | 3275.45 |
| 7446.68 | ठेवी | 8807.26 | 59.47 | इतर गुंतवणूक | 2.69 |
| 45.09 | बँक ओव्हरड्राफ्ट | 0.02 | 5760.60 | कर्ज | 6243.89 |
| 31.77 | देय व्याज तरतुद | 40.78 | 2.47 | चालु मालमत्ता | 3.45 |
| 10.35 | ऑडिट फी देय | 11.09 | 462.28 | कायम मालमत्ता | 470.13 |
| 150.03 | एन पी ए तरतुद | 139.66 | 106.74 | गुंतवणूकीवरील येणे व्याज | 89.35 |
| 65.62 | एन पी ए व्याज देणे | 88.73 | 65.62 | एन पी ए येणे व्याज | 88.73 |
| 104.73 | इतर देणी व तरतुदी | 117.00 | 10.59 | इतर येणे | 88.10 |
| 2181.51 | शाखांतर्गत व्यवहार | 2979.60 | 2181.51 | शाखांतर्गत व्यवहार | 2979.60 |
| 95.68 | नफा तोटा खाते | 106.99 | | | |
| 0.65 | मागिल वर्षाचा शिल्लक नफा | 0.44 | | | |
| 95.03 | चालु वर्षी नफा | 106.55 | | | |
| **11146.54** | **एकुण** | **13393.45** | **11146.54** | **एकुण** | **13393.45** |

| 31.03.2024 | खर्च | 31.03.2025 | 31.03.2024 | उत्पन्न | 31.03.2025 |
|---|---|---|---|---|---|
| 470.60 | ठेवीवरील व्याज | 575.25 | 654.39 | कर्जावरील व्याज / दंड व्याज | 773.87 |
| 3.46 | बाहेरील कर्जावरील व्याज | 1.47 | 188.46 | गुंतवणुकीवरील व्याज | 193.39 |
| 54.15 | पिग्मी एजंट कमीशन | 56.41 | 21.29 | इतर उत्पन्न | 18.42 |
| 4.17 | संचालकांवरील खर्च | 4.69 | | | |
| 157.72 | सेवकांवरील खर्च | 168.86 | | | |
| 1.20 | दुरध्वनी खर्च | 1.40 | | | |
| 4.31 | लाईटबील व इलेक्टिक | 5.30 | | | |
| 2.88 | ऑफिस भाडे | 3.20 | | | |
| 8.61 | कर (Taxes) | 7.42 | | | |
| 2.14 | विमा (Insurance) | 2.01 | | | |
| 3.04 | छपाई व स्टेशनरी | 2.58 | | | |
| 0.91 | जाहिरात व देणगी | 0.34 | | | |
| 1.99 | कायदा खर्च | 3.56 | | | |
| 8.05 | ऑडीट फी | 7.57 | | | |
| 16.87 | घसारा | 17.69 | | | |
| 6.26 | देखभाल व दुरुस्ती खर्च | 3.85 | | | |
| 20.30 | इतर खर्च | 17.53 | | | |
| 2.45 | इतर तरतुदी | 0.00 | | | |
| 95.03 | निव्वळ नफा | 106.55 | | | |
| **864.14** | **एकुण** | **985.68** | **864.14** | **एकुण** | **985.68** |

नागरी सह. पतसंस्था मर्या.
R. No. PNA/HLI/RSR/CR/433
DATE : 31/10/1998
मुख्य कार्यालय
विजयनगर, काळेवाडी, पुणे-१७

सुचक :- सौ.आशा विनायक पिंगळे (७३२३)
अनुमोदक :- श्री.सुरेश हगवणे ( २४०२३)
(ठराव सर्वानुमते मंजुर)

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

| | | |
|---|---|---|
| १) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा** | ३) सभेची तारीख : २०/०७/२०२५ | ५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी |
| २) सभेचा क्रमांक : **३७ वी** | ४) सभेची वेळ : स.१०.०० वा. | |

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे

सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|
| विषय क्र. ३ | ठराव क्र. ३ | **सन २०२४-२०२५ या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून स्वीकृत करणे.** |

लेखापरिक्षकांचे सर्टिफिकेट अहवाल पान क्र.१८ ते १९ वर दिलेले असून सन २०२४-२५ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी सीए एल एन गंडे, पिजेएमजे ॲण्ड असोसएटस चार्टर्ड अकौटंट, पुणे यांची नियुक्ती केलेली होती. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले आहे. सन २०२४-२५ करीता वैधानिक लेखापरिक्षक यांनी **संस्थेस ऑडीट वर्ग “अ”** दिलेला आहे. संस्थेचे महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सभेपुढे अहवाल वाचुन दाखविला त्यास सभासदांनी एकमताने मंजुरी दिली व ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री. प्रमोद बाळासाहेब देशमुख (१७११)

अनुमोदक :- श्री. मधुकर वाणी (५१७८)

(ठराव सर्वानुमते मंजुर)

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|
| विषय क्र. ४ | ठराव क्र. ४ | **सन २०२४-२०२५ च्या नफावाटणीस मान्यता देवून लाभांशास स्विकृत करणे.** |

संस्थेचा सन २०२४-२५ च्या नफा विभागणीस संचालक मंडळाने शिफारस करून अंतीम मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेस सादर केलेली आहे. सदर अहवालातील पान क्र.६ वरील नफाविभागणी सभेपुढे वाचुन दाखविल्यानंतर सदर नफा विभागणीस मंजुरी दयावी अशी विनंती महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सभासदांपुढे केली. सदर विषयी चर्चा झाल्यानंतर खालील नमुद तपशिला प्रमाणे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**सन २०२४-२५ ची नफा विभागणी**

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | मागील वर्षाचा शिल्लक नफा | 44,600.03 |
| 2 | चालु वर्षाचा नफा | 10,654,739.47 |
| | **एकुण नफा** | **10,699,339.50** |

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | राखीव निधी २५% | 2,674,835.00 |
| 2 | लाभांश शिफारस १०% (प्रोरेटा) | 3,445,998.00 |
| 3 | संशयीत बुडीत निधी (एनपीए तरतुद) | 1,000,000.00 |
| 4 | सेवक कल्यान निधी | 215,000.00 |
| 5 | तरलता स्थिरिकरण निधी | 881,000.00 |
| 6 | इमारत निधी | 1,033,000.00 |
| 7 | पशिक्षण निधी | 300,000.00 |
| 8 | सहकार पचार व जाहिरात | 200,000.00 |
| 9 | सेवक शिल्लक रजा तरतुद | 900,000.00 |
| 10 | पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | 49,506.50 |
| | एकुण | **10,699,339.50** |

सुचक :- श्री. राहुल हणमंत झांजुर्णे (३६३४)

अनुमोदक :- श्री. शिवाजी विठ्ठल बोराटे (६९७)

(ठराव सर्वानुमते मंजुर)

**श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित**
मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

**प्रोसिडींग बुक**

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा**
२) सभेचा क्रमांक : **३७ वी**
३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.
५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

विषय क्र. ५
ठराव क्र. ५

**सन २०२५-२०२६ सालाकरीता केलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देणे. गतवर्षाच्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे**

सन २०२५-२६ या सालाकरीता तयार केलेले अहवालातील पान क्र.१७ वरील अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेसमोर महाव्यवस्थापक यांनी वाचुन दाखविले सभासदांनी या अंदाज पत्रकास व गतवर्षाच्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता दिली व उपस्थित सभासदांनी ठराव एकमताने मंजुर केला.

सन २०२५-२०२६ सालचे अंदाजपत्रक

(आकडे लाखात)

खर्च

| अ.क्र. | खर्च | 2024-2025 | | वाढ/घट | शेरा | 2025-2026 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाज | प्रत्यक्ष खर्च | | वाढ/घट कारणे | अंदाज |
| 1 | दिलेले व्याज | 568.00 | 576.73 | 8.73 | व्याजदारातील बदल | 650.00 |
| 2 | कमीशन | 55.00 | 56.41 | 1.41 | कलेक्शन मधील वाढ | 60.00 |
| 3 | संचालकांवरील खर्च | 5.00 | 4.69 | -0.31 | - | 5.00 |
| 4 | सेवकांवरील खर्च | 160.00 | 168.86 | 8.86 | नवीन सेवक भरती | 190.00 |
| 5 | व्यवस्थापकीय खर्च | 80.00 | 72.45 | -7.55 | - | 75.00 |
| 6 | नफा | 105.00 | 106.54 | 1.54 | व्यवसाय वाढ | 119.00 |
| | एकुण | 973.00 | 985.68 | | | 1099.00 |

उत्पन्न

| अ.क्र. | उत्पन्न | 2024-2025 | | वाढ/घट | शेरा | 2025-2026 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाज | प्रत्यक्ष खर्च | | वाढ/घट कारणे | अंदाज |
| 1 | कर्जावरील व्याज | 768.00 | 773.87 | 5.87 | वाढीव कर्जवाटप व थकव्याज वसुली | 863.00 |
| 2 | गुंतवणुकीवरील व्याज | 175.00 | 193.39 | 18.39 | गुंतवणूक वाढ | 206.00 |
| 3 | इतर उत्पन्न | 30.00 | 18.42 | -11.58 | सर्विस चार्जेस घट | 25.00 |
| | एकुण | 973.00 | 985.68 | | | 1099.00 |

सुचक :- श्री.महादेव सोमनाथ मंडलीक (८० )
अनुमोदक :- श्री.पोपटराव सर्जेराव माने(४१६ )
(ठराव सर्वानुमते मंजुर)

विषय क्र. ६
ठराव क्र. ६

**सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता अंतर्गत,वैधानिक व सिस्टीम लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.**

शासकीय लेखापरिक्षण करणेकामी सहकार पॅनल वरील १) डी एम वोथरा, प्रमाणित लेखापरिक (अंतर्गत लेखापरिक्षण करीता) २) सी ए एस यु कटारीया ॲण्ड क. सातारा, (वैधानिक लेखापरिक्षण करीता) ३) सी ए एल.एन.गंधे पीजीएमजे असो पुणे, (वैधानिक लेखापरिक्षण करीता) इत्यादी लेखापरिक्षण करणेकामी अर्ज आल्याचे प्रशासनामार्फत सभेमध्ये सुचीत करण्यात आले.

**वरील अजपैकी सन २०२५-२६** या अहवाल वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षण करणे कामी सहकार पॅनल वरील लेखापरिक्षक सी ए एल.एन.गंधे पीजीएमजे असो पुणे, पॅनल नं.१०३१९ यांची नेमणूक करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी डी एम वोथरा, प्रमाणित लेखापरिक पॅनल नं १५८५२ यांना नियुक्त करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. वैधानिक लेखापरिक्षण शुल्क हे शासकीय परिपत्रकानुसार राहील असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.अंतर्गत लेखापरिक्षण फी रक्कम रु.२,००,०००/- इतकी ठरविण्यात आली असा ठराव सर्वनुमते मंजुर करण्यात आला.
सभेमध्ये चर्चा करण्यात आल्यानंतर संचालक मंडळाने सुचित केलेल्या नियुक्ती वरोवर असुन या नेमणुकी बावत ही सभा अंतीम मान्यता देत आहे असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.सतीश सदाशिव काटे (६३६७)
अनुमोदक :-श्री.सोपान बाबुराव रमाणे (४६१२)
(ठराव सर्वानुमते मंजुर)

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा**
२) सभेचा क्रमांक : **३७ वी**
३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.
५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

विषय क्र. ७

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

ठराव क्र. ७

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे तपशिलवार अहवालातील पान क्र.३ वर दिल्याप्रमाणे वाचन महाव्यवस्थापक यांनी केले. त्यावर चर्चा होवून त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

म.स.संस्था अधिनियम १९६० कलम ७५(२) अन्वये समिती सदस्य व नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचा तपशिल (दि.३१ मार्च २०२५ अखेर)

| तपशिल | दिलेले कर्ज | येणे कर्ज | थकीत कर्ज | वाटप कर्ज प्रमाण % | येणे कर्ज प्रमाण % | थकीत कर्ज प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|
| संचालक | 3500000 | 3155380 | - | 0.56% | 0.50% | - |
| संचालक व त्यांचे नातेवाईक | 19500000 | 16284190 | - | 3.12% | 2.61% | - |
| एकुण | 23000000 | 19439570 | - | 3.68% | 3.11% | - |

सुचक :- श्री.अमोल पोपटराव माने (१६४८)
अनुमोदक :- श्री.सुरेश नरहरी पांढरे (३४१२)
(ठराव सर्वानुमते मंजुर)

विषय क्र. ८

**नियम ४९ नुसार निर्लेखीत कर्जास व सामोपचार योजने अंतर्गत व तडजोडीने बंद केलेल्या कर्जास मान्यता देणे.**

ठराव क्र. ८

अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळ सभेमध्ये परिस्थिती नुसार तसेच संबधीत कर्जदार यांचे विनंती अर्ज व वसुली विभाग यांचे शे-यानुसार ठराव पारीत करून खालील प्रमाणे कर्जखाती तडजोडीने सुट देवून निर्लेखीत केलेली आहेत. शासनाच्या सामोपचार कर्ज परतफेड योजनेत सुट दिलेली नाही.

दि.०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ या आर्थिक वर्षात इतर सुट व सवलत दिलेल्या कर्जदारांची यादी

| अ.क्र. | शाखा | खाते क्र. | कर्जदाराचे नांव | तडजोड रक्कम | सुट दिलेली रक्कम | मासिक मि.दि.ठराव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | काळेवाडी | 20016/299 | गायकवाड रामदास यादव | 437598 | 273210 | 10.10.24 No.9(16) |
| 2 | सांगवी | 22178/45 | जगताप विश्वास माणिकराव | 938307 | 7100 | 10.01.25 No.3(5) |
| 3 | सांगवी | 22178/46 | जगताप विक्रम विश्वास | 965199 | 6485 | 10.01.25 No.3(5) |
| 4 | सांगवी | 20006/59 | गानबोटे संजय चंद्रकांत | 20359 | 2900 | 12.08.24 No.3(3) |
| 5 | भोसरी | 20016/47 | टकले हनुमंत भगवान | 55500 | 3813 | व्यवस्थापकीय अंतर्गत सुट |
| 6 | हडपसर | 22178/8 | डिंबळे गोपाळ गोविंदा | 280882 | 59769 | 10.03.25 No.9(7) |
| 7 | हडपसर | 20003/439 | नांदे दिपक बाजीराव | 1135400 | 7420 | 10.03.25 No.3(1) |
| 8 | हडपसर | 23294/41 | कुलकर्णी शरद दिनकर | 20000 | 2309 | व्यवस्थापकीय अंतर्गत सुट |
| | | | एकुण | 3853245 | 363006 | |

सुचक :- श्री.धर्माजी पांडुरंग मावळे (३५९)
अनुमोदक :- श्री.अजय सुरेशराव आंबेकर (१७०३८)
(ठराव सर्वानुमते मंजुर)

श्रमजिवी नागरी सह. पतसंस्था मर्या. R. No. PNA/HLI/RSR/CR/433 DATE : 31/10/1988 मुख्य कार्यालय विजयनगर, काळेवाडी, पुणे-१७

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

| | | |
|---|---|---|
| १) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा** | ३)सभेची तारीख : २०/०७/२०२५ | ५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी |
| २) सभेचा क्रमांक : **३७ वी** | ४)सभेची वेळ : स.१०.०० वा. | |

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे

सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

विषय क्र. ९

**सन २०२३-२४ व २०२४-२५ या वैधानिक लेखा परिक्षणाचे दोष दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.**

ठराव क्र. ९

**सन २०२३-२४** या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षणाचे दोष दुरूस्ती विहीत नमुन्यात व मुदतीत मा.सहकार आयुक्त कार्यालयाकडे लेखापरिक्षकांच्या शे-यासह दि. १८.१०.२०२४ रोजी सादर केलेला आहे.

**सन २०२४-२५** च्या अहवालाची दखल संस्थेच्या ऑडिट व तपासणी उपसमितीने वेळोवेळी घेतलेली असून अहवालातील गुणदोपांची व अपुर्ण बाबींची पुर्ततापुर्ण केली असून दोषपुर्तता अहवालाचे वाचन महाव्यवस्थापक यांनी सभेत केले. तयार करण्यात आलेला दोष दुरूस्ती विहीत मुदतीत व नमुण्यात मा.सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाकडे लेखापरिक्षकांच्या शे-यासह सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरावास मंजुरी देण्यात आली.

सुचक :- श्री.विजय गंगाधर गायकवाड (३६२६)

अनुमोदक :- श्री.किशोर सोपान महाजन (२२६१)

(ठराव सर्वानुमते मंजुर)

विषय क्र. १०

**पोट नियम दुरूस्तीस मान्यता देणे.**

ठराव क्र. १०

संस्थेचे महाव्यवस्थापक यांनी अहवाल पान क्र. २१ वर दिलेली पोटनियम दुरूस्ती चे वाचन उपस्थित सभेसमोर करण्यात आले. यावर चर्चा झाल्यानंतर अहवालात दिलेली दुरूस्ती मंजुर करण्यात आली. पोटनियम दुरूस्ती प्रस्ताव मुदतीमध्ये मा.सहकार आयुक्त कार्यालय यांच्या कडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

| पोटनियम उपविधी क्र. | सध्याच्या पोट-नियमांची शब्दयोजना | दुरुस्त झाल्याप्रमाणे पोट-नियमांची शब्दयोजना | दुरुस्तीची कारण |
|---|---|---|---|
| अ -३ | **संस्थेचे कार्यक्षेत्र**<br>संस्थेचे कार्यक्षेत्र **पुणे, नाशिक व कोकण** विभाग यांच्या भौगोलीक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | **संस्थेचे कार्यक्षेत्र**<br>संस्थेचे कार्यक्षेत्र **पुणे, नाशिक कोकण, औरंगाबाद व लातुर** विभाग यांच्या भौगोलीक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | कार्यक्षेत्र वाढीचे निकष पुर्तता होत असल्याने व सभासदांचे मागणी वरुन व्यवसाय वाढीसाठी. |

श्रमजिवी नागरी सह. पतसंस्था मर्या. R. NO. PNA/HL/RSR/CR/433 DATE : 31/10/1988 मुख्य कार्यालय विजयनगर, काळेवाडी, पुणे-१७

सुचक :- श्री.सुर्यकांत संभाजी गोफणे (३३८९)

अनुमोदक :- श्री.पिंगळे विनायक बाबुराव (२२९००)

(ठराव सर्वानुमते मंजुर)

विषय क्र. ११

**नफ्यातुन वर्ग करावयाच्या राखीव निधीच्या २५% वजावटीच्या रक्कमेचे प्रमाण कमी करून सदरची रक्कम इमारत निधीस वर्ग करणेस मान्यता देणे.**

ठराव क्र. ११

संस्थेचे महाव्यवस्थापक यांनी हा विषय उपस्थित सभेसमोर सादर केला. दि. ३१.०३.२०२५ अखेर संस्थेचा राखीव निधी रू. ३७५.४६ लाख इतका आहे. तसेच वसुल भागभांडवल रू. ३५४.१४ लाख आहे म्हणजेच रू. २१.३२ लाखाने राखीव निधी भागभांडवलपेक्षा जास्त झालेला असल्याने कायदयानुसार

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा**
२) सभेचा क्रमांक : **३७ वी**
३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.
५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|
| | | राखीवनिधीस वर्ग करावयाचे प्रमाण २५ टक्के वरून १० टक्के प्रमाणे शासन परवानगीने कमी करून सदरची रक्कम इमारत निधीस वर्ग करणेबाबत संचालक मंडळ विचार करत असल्याने शासनाकडे दाखल करावयाच्या प्रस्तावासाठी सदर विषयास वार्षिक साधारण सभेने मंजुरी देण्यात यावी अशी विनंती महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सभासदांपुढे केले. सदर विषयी चर्चा झाल्यानंतर त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.<br>मुचक :- श्री.प्रविण रामचंद्र ढमाळ (१३६२)<br>अनुमोदक:- श्री.धनंजय माधव वेलसरे (५४५९)<br>(ठराव सर्वानुमते मंजुर) |
| विषय क्र १२ | | **मुख्यालयास स्वतंत्र प्रशस्त जागा/इमारत खरेदी करणे बाबत विचार करणे.** |
| | ठराव क्र. १२ | प्रस्तावना - संस्थेच्या मुख्यकार्यालयासाठी स्वतंत्र व प्रशस्त जागा/ इमारत खरेदी करणे बाबत संचालक मंडळ सभा दि.१५.०४.२०२५ ठ.क १० अन्वये चर्चा होवून त्यामध्ये याबाबतीत अभ्यास समीती/उपसमीती नेमुन सदर समीतीने दि.१७.०७.२०२५ रोजी मासिक सभा ठ.क.८(४) अन्वये अहवाल संचालक मंडळास सादर केल्यानुसार संचालक मंडळाने याबाबतीत स्वतंत्र व प्रशस्त जागा/इमारत खरेदीस प्राथमीक मान्यता देवून सदरचा विषय अंतीम मान्यतेसाठी वार्षिक साधारण सभेस सादर केलेला आहे. याबाबतीत संचालक मंडळ उपसमितीचा सविस्तर अहवाल व सदर जागेची संस्थेच्या व्यवसायवाढीसाठी व सभासदांच्या दिर्घकालीन सोयीसाठी व संस्थेच्या आर्थिक स्थावर मजबुतीकरणासाठी, सभासदांचे विश्वासास भक्कमपणे पात्रठरणेसाठी संस्थेला काळेवाडी परिसरामध्ये प्रशस्त जागा/इमारत घेण्याबाबत सविस्तर विवेचन वार्षिक सभेमध्ये सभासदांचेपुढे संचालक मंडळाचे मार्फत सादर करण्यात आले त्यामध्ये चर्चेअंती सभासदांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या<br>१) नविन घेण्यात येणारी जागा/इमारत ही संस्थेच्या पुढील ५० वर्षाच्या वाटचालीचा विचार करून घेण्यात यावी.<br>२) सदरची जागा/इमारत यामध्ये सभासदांसाठी वार्षिक साधारण सभा कामकाज सभासदांसाठी सुसज्ज ग्रंथालय वाचनालय, सुसज्ज पार्किंगची व्यवस्था, जेष्ट सभासदांसाठी योग्य त्या सर्वसोयी इत्यादी बाबींचा संचालक मंडळाने विचार करावा.<br>३) नविन जागा/इमारत घेतांना संस्थेच्या व्यवसाय व नफा वाढीच्या दृष्टीने सदरची जागा मुख्य रस्त्या लगत, प्राइम लोकेशनवर असावी.<br>४) संस्थेचे बहुसंख्य खातेदार हे पिंपरी मंडईतील व काळेवाडी परिसरातील फळ व्यापारी असल्याने संस्थेस सदर जागेमध्ये सभासदांचे दृष्टीने कोल्ड स्टोअरेज (शितगृह) उपलब्ध होईल अशी जागा निवडण्यात यावी.<br>५) संस्थेच्या सभासदांसाठी धार्मिक व सामाजिक विधी व सभासदांचे कौटुंबीक कार्य उदा. लग्न, मुंज, वाढदिवस इत्यादीसाठी स्वतंत्र असा हॉल (बँक्वेट हॉल) याबाबतीचाही संचालक मंडळाने विचार करावा.<br>६) प्रशस्त जागा खरेदीसाठी आवश्यक असलेल्या सर्व निधी ताळेबंदास इमारत निधीस वर्ग करून तसेच अन्य प्रकारे सभासदांकडून लाभांषामधुन अथवा स्वतंत्र इमारत देणगी स्विकारून इमारत निधी वाढविण्यात यावा.<br>ठराव - उपरोक्त नमुद बाबींवर वार्षिक सभेमध्ये सविस्तर सकारात्मक चर्चा झाल्यानंतर सर्व सभासदांनी |

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा** | ३)सभेची तारीख : २०/०७/२०२५ | ५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी

२) सभेचा क्रमांक : **३७ वी** | ४)सभेची वेळ : स.१०.०० वा.

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे

सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|
| | | संस्थेच्या मुख्यकार्यालयास स्वतंत्र व प्रशस्त जागा/इमारत घेण्यास एकमताने मंजुरी दिली व यावाबतचे पुढील सर्व बाबींची पुर्तता करणे बावत सर्व अधिकार संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांना देवून ठराव मंजुर करण्यात आला.<br>सुचक :- श्री.नारायण हनुमंत सुराले (२५१२)<br>अनुमोदक:- श्री.विशाल सुदाम डोळस (२४०१७)<br>(ठराव सर्वानुमते मंजुर) |
| विषय क्र. १३ | | **संस्थेच्या निरा, इंदापुर, केंडगांव व चिंचवड येथील बंद केलेल्या शाखा परवानगी अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणे बाबत मान्यता देणे.** |
| | ठराव क्र. १३ | ठराव करण्यात येतो की, संस्थेच्या निरा, इंदापुर, केंडगाव व चिंचवड येथील बंद केलेल्या शाखा अन्य योग्य त्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यास सदरची वार्षिक साधारण सभा मान्यता देत असुन यावावत पुढील पुर्ततेसाठी सर्वाधिकार संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांना देवुन ठराव मंजुर करण्यात आला.<br>सुचक :- श्री.तानाजी वंडा चौगुले (३१९)<br>अनुमोदक:- श्री.सुनिल चिंदु राऊत (४०२०)<br>(ठराव सर्वानुमते मंजुर) |
| विषय क्र. १४ | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांचा विचार करणे.** |
| | ठराव क्र. १४ | उपस्थित सभेमध्ये काही सभासदांनी काही सुचना मांडल्या त्या खालील प्रमाणे<br>१) डॉ सुहास जाधव - संस्था अडतीसाव्या वर्षात पदार्पन करीत आहे .संस्थेच्या आजमीतीला १२ ते १५ शाखा काढणे आवश्यक होत्या तसेच लॉकर सुविधा सभासदांना उपलब्ध करून दयावी अशी सुचना मांडली.<br>२) श्री.विनायक पिंगळे - संस्थेच्या दैनंदिन प्रतीनिधींना तीन टक्के कमीशन देण्यात यावे तसेच सेवकांचा वेतन करार संपुण चार महिने झाले आहे अदयाप वेतन करारा बाबत काहीच झाले नाही. अशी सुचना मांडली.<br>३) श्री.पोपटराव माने - वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना जेवण दयावे अशी सुचना मांडली.<br>४) श्री.संजय देशमुख - सभादांना दरवर्षी बारा टक्के लाभांश देण्यात यावी अशी सुचना मांडली.<br>५) श्री.मधुकर बाणी - वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना जेवण दयावे व चांगल्या कामा बद्दल संचालकांचे आभार मांडले व त्यांना शुभेच्छा दिल्या.<br>सर्व प्रश्न समजावुन घेतल्या नंतर त्यावर मा.अध्यक्ष श्री.दिपक देशमुख यांनी सभेत संवधीतांशी सविस्तर चर्चा केली व यावर परिस्थितीनुसार भाविष्यात योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले. ऐनवेळचे विषय संपलानंतर संस्थेचे औपचारीक कामकाज संपल्याचे महाव्यवस्थपक यांनी घोषीत केले.<br>संस्थेच्या यशस्वी वाटचालीत सभासदांचे मौलीक सहकार्य लाभल्यामुळे संस्था प्रगतीपथावर पोहचलेली असुन फक्त महिला सभासदांकरीता सुरू करण्यात आलेली लक्ष्मी लकी ड्रॉ योजने बावत महाव्यवस्थापक यांनी |

PNA/HLI/RSR/CR/433 DATE 31/10/1998 मुख्य कार्यालय

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा**
२) सभेचा क्रमांक : **३७ वी**

३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.

५) सभेचे स्थळ : निळू फुले सभागृह, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

उपस्थित मान्यवर व सभासदांना माहिती दिली व आज वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांपुढे लक्ष्मी ड्रॉ काढणार आहोत असे सांगीतले. ज्या महिलांनी शाखेमध्ये मुदत ठेवी केल्या आहेत त्यांचे काउंटर लकी ड्रॉ बॉक्स मध्ये जमा करण्यात आलेल्या आहेत त्या बॉक्सचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व प्रत्येक शाखेतील बॉक्स मान्यवर व सर्व उपस्थित सभासदांच्या समक्ष सभासदांच्या लहान मुलांच्या हस्ते लकी ड्रॉ कुपन काढण्यात आले. काळेवाडीशाखेतुन दोन व प्रत्येक शाखेमधुन एक असे एकुण पाच लकी ड्रॉ काढण्यात आले. लक्ष्मी लकी ड्रॉ भाग्यवान विजेत्या आहेत काळेवाडी शाखेतुन विजेत्या सौ.रूपाली सतीश खोल्लम व सौ.उर्मिला राहुल गुरव, सांगवी शाखेतुन सौ.मंजुषा संजय सावंत, भोसरी शाखेतुन सौ.काजल विठ्ठल ढवळे तसेच हडपसर शाखेतुन कु.मोहीनी श्रीकृष्ण दीक्षीत या महिला विजयी झालेल्या आहेत.सर्व भाग्यवान विजेत्या महिला सभासदांचे सभागृहामध्ये मान्यवर व सभासदांनी हार्दिक अभिनंदन केले.

तसेच संस्थेच्या सभासदांसाठी नवीन सोलर कर्ज योजना व सोने खरेदी कर्ज योजना या बाबत महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सभासदांना माहिती दिली.

संस्थेच्या व्यवसायामध्ये संस्थेचे दैनंदिन ठेव प्रतिनिधी (पिग्मी एजंट) यांचा सहभाग संस्थेच्या स्थापनेपासुन अत्यंत मोलाचा व उपयोगी झालेला असुन संस्थेचे पिग्मी एजंत हे संस्थेच्या खऱ्या अर्थाने स्टार प्रचारक म्हणुन कार्यरत आहेत. अशा पिग्मी एजंट यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्था दरवर्षी उत्कुष्ट काम करणा-या पिग्मी एजंट यांना संस्थेमार्फत रोख बक्षीस देवून वार्षिक साधारण सभेत त्यांचा सत्कार करण्यात येतो. गत वर्षाप्रमाणे या वर्षीही संस्थेने त्यांना बोनस शेअर्स देवून सन्मानीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

अहवाल वर्षात निवड झालेले दैनंदिन ठेव प्रतिनिधी सत्कारमुर्ती पुढील प्रमाणे त्यांचा सत्कार सभेत करण्यात आला.

**संस्थेचे दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचा सत्कार**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **प्रथम क्र.काळेवाडी शाखा** | श्री.रविंद्र हिंदुराव इथापे | रू.४ कोटी १६ लाख, |
| २) | **दृतीय क्र.काळेवाडी शाखा** | श्री.लक्ष्मण रामचंद्र देशमुख | रू.३ कोटी ४० लाख, |
| ३) | **तृतीय क्र.काळेवाडी शाखा** | श्री.दत्तात्रय मारूती पवार | रू.१ कोटी ४३ लाख, |
| ४) | **प्रथम क्र.भोसरी शाखा** | श्री.अनिल यशवंत शिर्के | रू.३ कोटी १२ लाख, |
| ५) | **प्रथम क्र.हडपसर शाखा** | श्री.अनिल पदमाकर कुलकर्णी | रू.२ कोटी ६६ लाख, |
| ६) | **प्रथम क्र.सांगवी शाखा** | श्री.स्वप्नील दिलीप पाटील | रू. ८३ लाख, |

दरवर्षी संस्थेतील सेवकांना, अधिका-यांना व संचालकांना संस्थेच्या व्यवसायवाढीच्या दृष्टीकोणातून प्रोत्साहन मिळणेसाठी संस्थेमार्फत संस्थेच्या वार्षिक साधारण सभेच्या दिवशी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून त्यांचा सन्मानपुर्वक सत्कार करण्यात येतो.या वर्षामध्ये संस्थेने त्यांना बोनस शेअर्स देवून सन्मानीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अहवाल वर्षामध्ये असे पात्र सत्कारमुर्ती पुढील प्रमाणे आहेत.सदरच्या सर्व सेवक व संचालकांचे त्यांनी संस्थेसाठी केलेल्या व्यावसायीक योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे हार्दिक

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१/१, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

१) सभेचा प्रकार- **वार्षिक सर्वसाधारण सभा**
२) सभेचा क्रमांक : **३७ वी**

३)सभेची तारीख : २०/०७/२०२५
४)सभेची वेळ : स.१०.०० वा.

५) सभेचे स्थळ : निळु फुले रंगमंदीर, सांगवी

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे
सभेचे अध्यक्ष **श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन**

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|

संस्थेचे सेवक, अधिकारी व संचालक यांचा सत्कार :

*सेवक वर्ग*

१) सि.क्लार्क - सौ.प्रतिक्षा दिलीप पाटील रू.१ कोटी ६० लाख,

२) ज्य.क्लार्क - श्री.रामदास नवनाथ शेंडगे रू.० कोटी ८७ लाख,

३) शिपाई - श्री.नितीन जगदिश गाढवे रू. ० कोटी ८० लाख,

*अधिकारी वर्ग*

१) प्रथम क्र. श्री.किसन रामचंद देशमुख (वरीष्ठ व्यवस्थापक) रू.७ कोटी ४४ लाख,

२) दृतीय क्र. श्री.विजय ववुवाहन वाघमोडे (महाव्यवस्थापक) रू.६ कोटी ९७ लाख,

३) तृतीय क्र. सौ.हेमलता राजु तांबे (व्यवस्थापक-सांगवी) रू.२ कोटी ६१ लाख,

संस्थेचे संचालक ठवी गोळा केल्या बद्दल यांचा सत्कार

१) प्रथम क्र. श्री.प्रविण रामचंद्र ढमाळ (अध्यक्ष) रू.२ कोटी १० लाख,

२) दृतीय क्र. श्री.महादेव सोमनाथ मंडलीक (संचालक) रू.१ कोटी ६४ लाख,

३) तृतीय क्र. श्री.सुर्यकांत संभाजी गोफणे (संचालक) रू.१ कोटी ५४लाख,

संस्थेचे संचालक श्री विजय गायकवाड यांनी सर्व सभासदांचे आभार प्रदर्शन केल्या नंतर महाव्यवस्थापक यांनी प्रथम सत्राचे कामकाज संपल्याचे जाहीर केले व सभासदांकरीता नाष्टा तसेच पुढील गुणवंत विद्यार्थी बक्षीस कार्यक्रमाच्या सुचना दिल्या.

महाराष्ट्र गीतानी द्वितीय सत्राची सुरूवात करण्यात आली. मा.श्री.संजीवराजे नाईक निंबाळकर (माजी अध्यक्ष जिल्हा परिषद सातारा, अध्यक्ष खोखो असोसिएशन महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्ट), मा.श्री.विजयसिंह देशमुख (अतिरिक्त विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर), मा.श्री.डॉ.पी एल खंडागळे ( अप्पर निबंधक, सहकारी संस्था, म.रा.), मा.श्री.जयराज देशमुख (अपर तहसिलदार, तथा तालुका कार्य कारी दंडाधिकारी पिंपरी चिंचवड), मा.श्री.विक्रम देशमुख ( तहसिलदार तथा तालुका कार्य कारी दंडाधिकारी वडगांव मावळ), श्री.अभयसिंह नाईक निंबाळकर, श्री.शंकरराव माडकर, श्री.दत्तात्रय वारे गुरूजी (शिक्षक वाबळेवाडी ) संस्थेचो अध्यक्ष श्री.दिपक देशमुख इत्यादी मान्यवरांच्या हस्ते दिप प्ज्वलन करण्यात आले.

श्रमजिवी नागरी सह. पतसंस्था मर्या.
R. NO. PNA/HLI/RSR/CR/433
DATE : 31/10/1988
मुख्य कार्यालय

आलेल्या पाहुण्यांचे संस्थेच्या वतीने व संस्थेचे पदाधिकारी व सर्व संचालक यांच्या वतीने महाव्यवस्थापक यांनी स्वागत केले तसेच आलेल्या पाहुण्यांचा सत्कार पुष्पगुच्छ देवून करण्यात आला.हा सत्कार संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष श्री दिपक देशमुख व संचालक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला.

# श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

मुख्य कार्यालय :-९५१ १, विजयनगर, मेनरोड, काळेवाडी, पिंपरी पुणे १७

## प्रोसिडींग बुक

| | | |
|---|---|---|
| १) सभेचा प्रकार- वार्षिक सर्वसाधारण सभा | ३)सभेची तारीख : २० ०७/२०२५ | ५) सभेचे स्थळ : निळु फुले सभागृह, सांगवी |
| २) सभेचा क्रमांक : ३७ वी | ४)सभेची वेळ : स.१०.०० वा. | |

६) सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची (हुद्यासह) नावे

सभेचे अध्यक्ष श्री.दिपक शिवाजीराव देशमुख - विद्यमान चेअरमन

| विषय नं. | ठराव नं. | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय आणि ठराव |
|---|---|---|
| | | कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मान्यवर मा.श्री.संजीवराजे नाईक निंबाळकर, मा.श्री.विजयसिंह देशमुख, मा.डॉ.पी एल गंडागळे, मा.जयराज देशमुख व मा.विक्रमजी देशमुख व मा.दत्तात्रय वाघे गुरूजी यांनी संस्थेच्या प्रगती विषयी सभासदांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी मार्गदर्शनपर भाषण केले तसेच विद्यार्थींना मार्गदर्शन केले.उपस्थित सभासदांनी व विद्यार्थ्यांनी भाषणास उत्स्फूर्तपणे दाद दिली. |
| | | सर्व सत्कार व मान्यवर यांचे मार्गदर्शन झाल्यानंतर दुस-या सत्रातील कार्यक्रमास सुरवात झाली तो म्हणजे बक्षीस वितरण समारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष सत्कार - |
| | | सभासदांच्या पाल्यामधुन १० वी व १२ वी प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषीक देवून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. |
| | | **१० वी - प्रथम तिन क्रमांक** |
| | | प्रथम क्र.सृष्टी नानाजी पाटील.. ९६.६० % |
| | | द्वितीय क्र.अथर्व राजु जाधव.. ९३.८० % |
| | | तृतीय क्र.स्वरदा अतुल डिंगणकर.. ९३.३० % |
| | | **१२ वी- प्रथम तिन** |
| | | १) प्रथम क्र.कु.वेदी भुपींदर जगपीतम.. ९०.०० % |
| | | २) द्वितीय क्र.कु.सायली जयसिंग गलांडे.. ८८.०० % |
| | | ३) तृतीय क्र.कु.जानकी हिमांशु शहा.. ८७.०० % |
| | | **विशेष सत्कार-** |
| | | १) प्रज्वल प्रविण जनदाडे.. Neet Exm Mrk 534 MBBS |
| | | २) समिरण मुस्ताक आत्तार.. CA Exm Mrk 326 |
| | | ३) अनिकेत रामकिसन वढणे.. CA Exm Mrk 322 |
| | | इयत्ता ज्यु.के जी, सि.के जी तसेच १ ते ३ वी पर्यतचे सर्व विद्यार्थ्यांना यादी प्रमाणे पारीतोषीक देवून गुणगोरव करण्यात आला.इयत्ता ४ ते ८ वी पर्यतचे सर्व विद्यार्थ्यांना यादी प्रमाणे पारीतोषीक देवून गुणगोरव करण्यात आला.इयत्ता ९ ते १२ वी पर्यतचे सर्व विद्यार्थ्यांना यादी प्रमाणे पारीतोषीक देवून गुणगोरव करण्यात आला. FY,SY,TY, Engineering/ Diploma, डॉक्टर, वकील व इतर यांचा सत्कार यादी प्रमाणे पारीतोषीक देवून गुणगोरव करण्यात आला. |
| | | दि.२० जुलै २०२५ या वार्षिक सर्वसाधारण सभेचा समारोप हा पसायदानाने झाला.शेवटी उपस्थित सर्व सभासद, प्रमुख पाहुणे व विद्यार्थी यांचे आभार मानुन व निवेदकांचा सत्कार करून सभेचा समारोप करण्यात आला गुणवंत बक्षीस समारंभ व सभा संपल्याचे महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले. |
| | | श्रमजिवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. करिता |
| | | महाव्यवस्थापक [illegible] चेअरमन |